प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १८ जुलै २०२४**

## सिडकोच्या बामणडोंगरी गृहनिर्माण योजनेतील दुकानांकरिता ई-लिलाव प्रक्रिया २२ जुलै २०२४ रोजी पार पडणार

बामणडोंगरी गृहनिर्माण प्रकल्पातील दुकानांची ई-लिलाव प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबली होती, त्या टप्प्यापासून सदर प्रक्रिया सिडकोतर्फे २२ जुलै २०२४ रोजी पुन्हा सुरू (Resume) केली जाणार असून योजनेचा निकाल २३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. यापूर्वी सदर दुकानांकरिता ई-लिलाव प्रक्रिया २२ मे २०२४ रोजी नियोजित होती; परंतु तांत्रिक कारणास्तव सदर ई-लिलाव प्रक्रिया पार पडू शकली नाही. ज्या अर्जदारांनी पूर्वीच या योजनेसाठी नोंदणी केली होती असे संभाव्य खरेदीदार/अर्जदार या ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ शकतात.

सिडकोतर्फे १४ मार्च २०२४ रोजी नवी मुंबईतील सिडकोच्या बामणडोंगरी गृहनिर्माण संकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत वेगाने विकसित होणाऱ्या उलवे नोडमधील बामणडोंगरी येथील सिडको गृहसंकुलातील २४३ दुकाने उपलब्ध करून देण्यात आली होती. रेल्वे, रस्ते, अटल सेतू (एमटीएचएल) द्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प साकारण्यात येत आहे.

या योजनेकरिता निविदाकारांकडून २१ मे २०२४ पर्यंत बंद निविदा सादर करण्यात होत्या. तसेच २२ मे २०२४ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०६.०० या वेळेत योजनेकरिता ई-लिलाव नियोजित होता. परंतु, तांत्रिक कारणास्तव ई-लिलाव प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नव्हती.

याकरिता ज्यांनी योजनेकरिता अर्ज नोंदणी केली आहे अशा संभाव्य खरेदीदार/अर्जदारांकरिता २२ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०६.०० या वेळेत https://eauction.cidcoindia.com या संकेतस्थळावर ई-लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे. तसेच योजनेचा निकाल २३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात येणार आहे, याची संबंधित अर्जदारांकडून नोंद घेण्यात यावी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**